# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १५६-२२ दिनांक :- ३०/०५/२०२२

## हायवेवर जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांस गजाआड करण्यास पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २१/०५/२०२२ रोजी ०२.१५ वा. चे सुमारास मुन्ना ऑटो गॅरेजचे समोर, मुंबई-अहमदाबाद महामार्ग क्रं. ८ चे गुजरात वाहिनीवरील सर्व्हिस रोडवर, वसई फाटा, वसई (पु.), ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी व साक्षीदार हे ॲक्टीव्हा मोटार सायकलवर मुंबई-अहमदाबाद महामार्गने चालवुन घेवुन जात असतांना चार अनोळखी इसमांनी फिर्यादी यांची मोटार सायकल अडवुन त्यांना मारहाण करुन त्यांचे खिशात ठेवलेला आयफोन मोबाईल फोन, ४७००/- रुपये रोख रक्कम जबरीने काढुन घेवुन पळुन गेले होते. सदरबाबत श्री सुरज महेंद्र खांडेकर, वय-२० वर्षे, रा. हनुमान नगर, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतां विरुध्द पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ४३६/२०२२ भा.दं.वि.सं.कलम- ३९४, ३४२ प्रमाणे दिनांक २१/०५/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळास भेट देवून व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपी नामे. १) बिकेश महेंद्र यादव, २) शैलेश दिलीप पांडे, दोन्ही रा. संतोषभुवन, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर हे मिळुन आल्याने त्यांना दि.२९/०५/२०२२ रोजी नमुद गुन्हयात अटक केली आहे. नमुद आरोपीत यांचेकडून गुन्हयात वापरलेल्या दोन मोटार सायकल व चोरीस केलेला मोबाईल फोन असा एकुण- १,३५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री.महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, किरण आव्हाड, रोशन पुरकर, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.